**नि. क्र. २२३ च्या आदेशावरुन प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे साक्षीदार क्र. ५.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – अमीर अब्दुल लतीफ.

**वय** – ४५ वर्ष, **व्यवसाय** – बॉंड रायटर,

**राहणार**– रवळनाथ कॉलनी, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. मी सन २००४ पासून दस्तलेखनाचे काम करत असून माझ्याकडे त्याबाबतचा परवाना नाही. मी दस्तलेखनाचे काम आजरा तहसिल कार्यालयाच्या आवारात करतो. मला या दाव्यातील वादी व प्रतिवादीं बाबत माहिती आहे.

**२.** माझे वडिल देखील दस्तलेखनाचे काम करत असून भाऊ समीर हा मुद्रांक विक्रीचे काम करतो. आम्ही सर्व एकत्र काम करतो. मी जयजयराम दाजी पाटील व रामा दाजी पाटील हे आमच्याकडे येत असल्यामुळे त्यांना ओळखतो. मारुती परसू तुप्पट आमच्याकडे कामासाठी येत असल्यामुळे मी त्यांना ओळखत होतो. ते दि.२६.०३.२००८ रोजी आमच्या कार्यालयात खरेदीपत्र करण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी ७/१२, आठ अ व इनामपत्रक उतारा सोबत आणला होता.

**३.** त्यांनी त्याच दिवशी खरेदीपत्रासाठी स्टॅंप विकत घेतला होता. त्यांच्या सोबत दोन साक्षीदार आलेले होते. मला जयजयराम पाटील याने खरेदीपत्राची माहिती दिली होती. त्यांच्यामध्ये किणे येथील गट क्र.३३० मधील २.३ आर जमिनीचा व्यवहार झाला होता. मी दिलेल्या माहिती प्रमाणे संगणकावरती दस्ताचे टंकलेखन केले होते. त्या दस्ताला रामा दाजी पाटील याने मान्यता दिली होती.

**४.** मी दस्ताचे टंकलेखन झाल्यावर लिहून देणार व घेणार यांना तो वाचून दाखवला होता. तो जयजयराम पाटील याने बरोबर असल्याचे मान्य केल्यावर मी त्याचा निशाणी अंगठा घेऊन लिहून घेणार व मान्यता देणार यांच्या स्वाक्ष–या घेतल्या होत्या. त्यावरती भरत पाटील व अर्जुन तुप्पट यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्ष–या केल्या

होत्या. मी त्या दस्तावरती दस्तूर म्हणून माझी इंग्रजी मधील स्वाक्षी केली आहे. मी त्या दस्तावरती जयजयराम पाटील याच्या डाव्या निशाणी अंगठयाला दस्तूर म्हणून स्वाक्षरी केली आहे.

५. जयजयराम पाटील याने दि.२४.०३.२००८ रोजी शपथपत्र केले होते. मी त्यावरती ओळखदार म्हणून स्वाक्षरी केली आहे. ते शपथपत्र खरेदी दस्ताला जोडले आहे. मी खरेदीदस्त करुन दिल्यानंतर ते नोंदणी करण्यासाठी घेऊन गेले होते. आता मला दाखवलेला दस्ताच्या प्रमाणित प्रतीतील मजकूर मी टंकलिखित केला असून त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. त्यातील जयजयराम पाटील याच्या निशाणी अंगठयाला मी दस्तूर दिलेला आहे. त्यातील मजकूर मला सांगितल्या प्रमाणे नमूद केलेला आहे. तो मी ओळखतो. त्याला **नि. क्र. २२५** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.**

६. माझे दहावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. माझ्याकडे दस्तलेखनाचा परवाना नाही. दस्तलेखनीक व स्टँप विक्री हे दोन वेगवेगळे व्यवसाय आहेत. आमचे शिवाजीनगर येथील प्रकाश हरमळकर यांच्या दुकानात कार्यरत आहे. आम्ही त्यांच्या सोबत भाडेकरार केलेला नाही. प्रकाश हरमळकर यांच्या दुकानालगत महाराष्ट्र बँकेचे ए. टी. एम. आहे. त्यालगतच्या गाळयात त्यांचे झेरॉक्सचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच गाळयात बशीर शिदवणकर दस्तलेखनाचे काम करतो.

७. त्या गाळयामध्ये बशीर शिदवणकर टंकलेखनाचे काम करतो. आम्हाला त्या गाळयामध्ये पार्टीशन करुन १० x १२ ची वेगळी जागा दिली आहे. मी दुकानामध्ये उत्तरेकडे तोंड करुन बसतो. माझ्या समोर माझे संगणक असते. त्याच्या समोर दोन बाकडे आहेत. गाळयाच्या बाहेरील जागेत लोकांना बसण्यासाठी कट्टा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडे काम करण्यासाठी आलेली माणसे बाहेर बसलेली असतात.

८. मला दिलेल्या ७/१२ उता–यामध्ये प्रत्येक धारकाचे क्षेत्र वेगळे नव्हते.

साक्षीदार स्वतःहून सांगतो, ८/अ उता–यामध्ये वेगळे क्षेत्र दिलेले होते.

प्रश्न – वर्ग–२ जमिनीच्या विक्रीसाठी महसूल खात्याची परवानगी लागते

उत्तर – नि. क्र.२२५ चा दस्त करताना महसूल विभागाच्या परवानगीची गरज नव्हती.

९. माझ्याकडे परवानगी लागत नाही असा कोणताही कागद देण्यात आला नव्हता. मला लिहून देणार व घेणार यांनी दिलेली मतदार ओळखपत्रे दस्तासोबत जोडलेली नाहीत. मी वडिलार्जित जमीन असल्यास तिचा दस्तामध्ये उल्लेख करतो. माझ्यासमक्ष दस्तातील रकमेची देवाण–घेवाण झालेली नाही. मला त्या रकमेचा त्यांनी कशाप्रकारे वापर केला याची माहिती नाही. मी आज नि. क्र.२२५ चा मूळ दस्त पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४.०३.२००८ रोजी सदर दस्तातील खरेदी देणार माझ्या कार्यालयात आले नव्हते.

१०. माझ्याकडे दस्त करणा–यांनी तुकडेबंदी बाबतची परवानगी घेतल्याचा कागदोपत्री पुरावा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी जयजयराम पाटील हजर नसताना खोटा दस्त तयार केला आहे. माझे संगणकावरती टंकलेखनाचे शिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दस्तावरती कोणताही दस्तूर दिलेला नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १३.०१.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.